# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. ३१/०८/२००५

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा बुधवार दिनांक ३१/०८/२००५ रोजी सभा सुचना क्र. १३ दि. २६/०८/२००५ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मोहन पाटील हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मोहन मधुकर पाटील | सभापती |
| २) | श्री. मिलन गोविंदराव पाटील | सदस्य |
| ३) | श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर | सदस्य |
| ४) | श्री. केशव रामभाऊ घरत | सदस्य |
| ५) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| ६) | श्रीम. जानी कैलाशबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| ७) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| ८) | श्री. रमेश धरमचंद्र जैन | सदस्य |
| ९) | श्री. रतन कृष्णा पाटील | सदस्य |

**गैरहजर सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. जयंत महादेव पाटील | सदस्य |
| २) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ३) | श्रीम. प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| ४) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | सदस्य |
| ५) | श्री. शफिक अहमद खान | सदस्य |
| ६) | श्रीम. ग्रिटा स्टीफन फॅरो | सदस्या |
| ७) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे स्वागत करून आजच्या सभेच्या कामकाजाला प्र. सचिवांनी सुरूवात करावी.

(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १०३ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य श्री. सुर्यकांत भोईर ह्यांनी प्रकरण क्र. १०३ चा ठराव सभागृहात मांडला.)

**गजानन भोईर :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. १०३ :-**

लघुलेखक पुरवठा कामी आलेल्या निविदेस मंजुरी देणे.

**ठराव क्र. १०९ :-**

नगरसचिव विभागाकरिता ठेका पद्धतीने ४ (चार) लघुलेखक (स्टेनो) पुरवठा करणेबाबत ''दै. मुंबई सकाळ'' व ''दै. सुरजप्रकाश'' या वृत्तपत्रामध्ये पुरवठादारांकडून जाहिर निविदा मागविणेंत आल्या होत्या. निविदा सादर करावयाच्या मुदतीत खालील निविदाधारकांनी आपले दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | सादर केलेले दर (प्रति दिवस प्रति लघुलेखक) |
|---|---|---|
| १) | मे. ध्रुव कॉम्प्युटर्स | रु. १९८/- |
| २) | मे. निलेश क्रिएशन | रु. २१०/- |
| ३) | मे. हेना इंटरप्राईजेस | रु. २१४/- |

वरीलपैकी तुलनात्मक दरपत्रक पाहता ''मे. ध्रुव कॉम्प्युटर्स'' यांची रु. १९८/- प्रती दिवस प्रती लघुलेखक ही सर्वात कमी दराची निविदा आहे. तरी मे. ध्रुव कॉम्प्युटर्स यांची सर्वात कमी दराची निविदा स्विकारणेंस व ''आदर्श प्रिंटर्स'' ह्यांनी त्यांची मुदत संपलेनंतरही लघुलेखक पुरवठा केल्याचे देयक अदा करणेंस ही मा. स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. सुर्यकांत भोईर. अनुमोदन :- श्री. गजानन भोईर.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १०४ चे वाचन केले.)

**डॉ. रमेश जैन :-**

सभापती साहेब, गोषवारा नही है।

**सुर्यकांत भोईर :-**

गोषवारा नंतर दिलेला आहे.

**केशव घरत :-**

सभापती साहेब, हा ठराव मांडण्या अगोदर पल्स पोलिओचा विषय घ्यायचा आहे.

**रतन पाटील :-**

सभापती साहेब, ठराव मांडण्यापुर्वी चर्चा करुन घेऊ या.

**मा. सभापती :-**

ठराव मांडल्यानंतर चर्चा करण्यांत येईल.

(सन्मा. सदस्य श्री. सुर्यकांत भोईर ह्यांनी प्रकरण क्र. १०४ चा ठराव सभागृहात मांडला.)

**मिलन पाटील :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**रतन पाटील :-**

सभापती साहेब, ५० एम.एल.डी. योजनेद्वारे जी पाईपलाईन अगोदर टाकलेली होती, ती किती इंचाची टाकली गेली होती व आता आपण किती इंचाची पाईप लाईन टाकणार आहोत. तसेच कुठल्या कुठल्या विभागातून टाकली जाणार आहे. ज्या विभागामध्ये व्यावसायिक बिल्डर आहेत, जे कॉम्प्लेक्स बनवतात त्यांच्या फायद्यासाठी आपण ही पाईप लाईन टाकत तर नाही ना! त्याचा आपण खुलासा करावा.

**मा. सभापती :-**

याबाबत आपल्याला प्रशासन खुलासा देतील. कोणत्या विकासकर्त्यांच्या फायद्याकरिता पाईप लाईन टाकलेली नाही. ज्या ठिकाणी विकासकर्ते इमारती बांधतात, त्या ठिकाणी येणारा रहिवाशी व त्या रहिवाशाच्या सोयीसाठी आपण ह्या पाईप लाईनचे काम करत आहोत.

**शिवाजी बारकुंड :-**

सदर भागामध्ये ५० एम.एल.डी. स्कीममधून पाईप लाईन टाकलेली नाही.

**रतन पाटील :-**

आपण सांगितलेले आहे, सिनेप्राईमपासून ते गोल्डन नेस्ट.

**शिवाजी बारकुंड :-**

जो पाणी पुरवठा होत आहे तो सिनेप्राईमपासून ते मेन रोडला येते व मेन रोडपासून ते काशीमिरा रोडवरून पाणी अत्यंत कमी दाबाने आहे अशा नागरिकांच्या तक्रारी आहेत.

**रतन पाटील :-**

साहेब, काशीमिरा रोडला किती इंचाची पाईप लाईन टाकलेली आहे.

**शिवाजी बारकुंड :-**

काशीमिराला डिस्ट्रीब्युशन लाईन अडीचशेची आहे आणि आता आपण नविन प्रस्तावित लाईन केली ती तीनशे, अडीचशे, दोनशे आणि दिडशे अशी कन्टीन्यु एकच लाईन नाही. त्या विभागात नागरिक राहतात व त्यांच्या भयंकर तक्रारी आहेत आणि हे काम करणे अत्यंत आवश्यक आहे. काम केले तर त्या भागातील पाण्याचा प्रॉब्लेम सुटू शकेल.

**रतन पाटील :-**

सभापती साहेब, स्थायी समितीला मा. महासभेने पन्नास लाखाच्या खर्चाची तरतुद दिलेली आहे. तसा अधिकार दिलेला आहे. त्याचबरोबर इतर जे काही विभाग आहेत त्यांनासुद्धा तशाच पद्धतीने आपण त्यांना सामावून घ्या. त्यांच्यासाठी तशी तरतुद करा अशी विनंती आहे.

**मा. सभापती :-**

पुढच्या मा. महासभेल विषय घेऊ. प्रकरण क्र. १०४ चा जो ठराव मांडला तो ठराव सर्वानुमते मंजुर करण्यांत येत आहे.

**गजानन भोईर :-**

सभापती साहेब, ह्या विषयाला धरुनच बोलतोय. मागे मंजुरी घेतली होती. मीटर बसवून त्या पाण्याचे मेजरमेन्ट त्याची प्रोसीजर कुठपर्यंत आली आहे? पाणी कुठून वाया जाते की, जास्त जाते?

**शिवाजी बारकुंड :-**

मीटरची ऑर्डर दिलेली आहे व कामकाज हे चालू आहे.

**गजानन भोईर :-**

ते काम अंदाजे किती दिवसात, किती महिन्यात होईल?

**शिवाजी बारकुंड :-**

साधारण तीन महिने लागतील.

**केशव घरत :-**

बारकुंड साहेब, पाण्याचे टँकर चोरीने विकले जायचे ते व्यवस्थित झाले का?

**शिवाजी बारकुंड :-**

प्रत्येक टाकीला आपण मीटर बसवलेले आहे.

**रतन पाटील :-**

प्रत्येक टाकीकडे आपले मीटर बसवलेले आहे का?

**शिवाजी बारकुंड :-**

होय.

**रतन पाटील :-**

त्यात काही बिघडलेले आहे त्याची पाहणी करुन घ्या.

**शिवाजी बारकुंड :-**

ठिक आहे.

**प्रकरण क्र. १०४ :-**

पाणी पुरवठा विभागातील विकासकामांना आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणे.

**ठराव क्र. ११० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीतील कनाकिया जलकुंभावरुन शांती विद्यानगरी, हटकेश, रामदेव पार्क, न्यु गोल्डन नेस्ट, इंद्रलोक परीसरात पाणी पुरवठा होत आहे. सदर परीसरामध्ये विकासकर्त्यातर्फे गृहसंकुलांचे काम फार वेगाने सुरु असल्याने ५० दलली योजनेअंतर्गत टाकण्यात आलेल्या जलवाहिन्यांमार्फत होणारा पाणीपुरवठा अपुरा पडत आहे. सदर विभागाचे सर्वेक्षण केले असता कनाकिया जलकुंभावरुन सिनेप्राईम ते न्यु गोल्डन नेस्टपर्यंत मुख्य जलवाहिनी अंथरणे आवश्यक आहे. सदर जलवाहिनी अंथरणेबाबत रु. ४९,९६,२९०/- इतका खर्च अपेक्षित आहे.

सिनेप्राईम ते रामदेव पार्क पर्यंतचा रस्ता हा विकास आराखड्यातील १८ मी. एवढा रुंदीचा आहे. तसेच रामदेव पार्क ते आयडीयल पार्क हा रस्ता विकास आराखड्यात १८ मी. एवढ्या रुंदीचा दर्शविला आहे. रामदेव पार्क, क्वीन्स पार्क, न्यु गोल्डन नेस्ट, इंद्रलोक परिसरात आवश्यक त्या दाबाने व पुरेसा पाणी पुरवठा होण्याचे दृष्टीने वरील पाईप लाईनचे काम करणे आवश्यक आहे. सबब उपरोक्त कामास मा. स्थायी समिती सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. सुर्यकांत भोईर.** **अनुमोदन :- श्री. मिलन गो. पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १०५ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य श्री. गजानन भोईर ह्यांनी प्रकरण क्र. १०५ चा ठराव सभागृहामध्ये मांडला.)

**सुर्यकांत भोईर :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**रतन पाटील :-**

सभापती साहेब, आपण संबंधित चांगली योजना हाती घेतलेली आहे. पण मागच्या वेळी आपण विसर्जनाच्या वेळेला काय योजना ठेवली होती?

**मा. सभापती :-**

मागच्या वेळी निर्माल्य कलश नव्हते म्हणून आपण यंदा सोय केलेली आहे.

**रतन पाटील :-**

सोय होती, गेल्या वेळी आपण काही ठिकाणी टाक्या ठेवल्या होत्या, त्या टाक्यांचे काय झाले?

**मा. सभापती :-**

आपण ते पुन्हा आणत आहोत.

**रतन पाटील :-**

पुन्हा आणतोय ते बरोबर आहे. पण मागच्या वेळच्या टाक्या कुठे आहेत? त्या आपल्याकडे आहेत का? की, परत आपण त्याच्यासाठी मंजुरी घेत आहोत, अडीच लाख रुपये.

**दिपक खांबित :-**

साहेब, मागच्या वेळेच्या टाक्यांपैकी चार टाक्या फुटल्या व बाकीच्या टाक्या गार्डनमध्ये वापरल्या आहेत.

**प्रकरण क्र. १०५ :-**

विसर्जनाचे ठिकाणी निर्माल्य कलश ठेवणे बाबत.

**ठराव क्र. १११ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत गणेश मुर्तीचे विसर्जन हे एकूण १५ ठिकाणी करण्यात येते. गणेश मुर्तीचे विसर्जन करतेवेळी गणेशमुर्ती सोबत निर्माल्य तलाव व खाडीत टाकण्यात येतो. सदर निर्माल्य टाकण्याकरीता विसर्जन ठिकाणी निर्माल्य कलश बांधल्यास त्यामध्ये सक्तीने निर्माल्य कलश टाकता येईल. सदर कामी सिंटेक्स टाक्या खरेदी केल्यास सदर टाक्या नंतर सुद्धा वापरता येऊ शकतील.

५००० लीटर सिंटेक्स टाकी : ०२ नग

२००० लीटर सिंटेक्स टाकी : १२ नग

वरील कामाकरीता एकूण रु. २.५० लक्ष एवढा खर्च अपेक्षित आहे. तसेच श्री विसर्जन ठिकाणी महानगरपालिकेमार्फत सार्वजनिक गणेश मंडळांना नारळ व विडा देण्याचा प्रस्ताव असून त्याकरिता रु. १०,०००/- खर्च अपेक्षित आहे.

तरी वरील खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. गजानन भोईर.** **अनुमोदन :- श्री. सुर्यकांत भोईर.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १०६ चे वाचन केले.)

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्यांना सुचित करतो की, प्रकरण क्र १०६ आहे, तर प्रकरण क्र. ११३ पुढे आहे त्यावेळी तो विषय एकत्रित घेऊ. सचिवजी पुढचा विषय घेण्यांत यावा.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १०७ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य श्री. सुर्यकांत भोईर ह्यांनी प्रकरण क्र. १०७ चा ठराव सभागृहात मांडला.)

**मिलन पाटील :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

प्रकरण क्र. १०७ चा ठराव सर्वानुमते मंजुर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. १०७ :-**

निविदांना मंजुरी देणे (पाणी पुरवठा विभाग)

**ठराव क्र. ११३ :-**

अ) **सी.आय. (मॅकेनिकल फिटींग व जॉईंटस) आय.एस. नं. १३३८२ - १९९२ आणि समकक्ष आय.एस.ओ./बी.एस. स्टँडर्ड प्रमाणे पुरवठा करणे.**

वरील कामाकरीता दि. ३०/०६/२००५ **दै. महाराष्ट्र जनमुद्रा व दै. नवशक्ति** या वृत्तपत्रांत जाहिर निविदा सूचना प्रसिद्ध करुन पुरवठादारांकडून स्पर्धात्मक निविदा मागविणेंत आल्या होत्या. त्यास अनुसरुन प्राप्त देकारांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अंदाजित रक्कम | पुरवठादाराचे नांव | देकार |
|---|---|---|
| रु. २८,७९,०२०/- | १) मे. केशरी ॲन्ड कंपनी | ६.२५% जास्त दराने |
| | २) मे. विंध्या ट्रेडर्स | ८.९८% जास्त दराने |
| | ३) मे. कपिलांश धातु उद्योग प्रा. लि. | १५.५४% जास्त दराने |

उपरोक्त देकारांचा तुलनात्मक तक्ता पाहता **मे. केशरी ॲन्ड कंपनी** यांनी सादर केलेली निविदा ही लघुत्तम असून **अंदाजपत्रकापेक्षा ६.२५% जास्त दराची आहे.** निविदेत सादर केलेले दर हे बाजारभावातील दराशी तुलना करता योग्य व रास्त आहेत. सबब **मे. केशरी ॲन्ड कंपनी** यांची सर्वात कमी दराची निविदा मंजुर करणेस व या कामी वेळोवेळी येणारी देयके प्रदान करणेस मा. स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. सुर्यकांत भोईर.** **अनुमोदन :- श्री. मिलन गो. पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १०८ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य श्री. गजानन भोईर ह्यांनी प्रकरण क्र. १०८ चा ठराव सभागृहात मांडला.)

**डॉ. रमेश जैन :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**रतन पाटील :-**

सभापती साहेब, ती जागा कोणाची आहे? कशासाठी हटवणार?

**मा. सभापती :-**

सद्या जागेमध्ये जी मुतारी होती, ती जागा पुर्वी त्या ठिकाणी लोकांच्या गरजेनुसार महानगरपालिकेने सुविधा निर्माण केली होती. परंतु, नंतर खाजगी मालकाने सर्व्हे केल्यानंतर टी.आय.एल.आर. सर्व्हे केल्यानंतर ती जागा खाजगी जागेमध्ये निघाली. त्यामुळे त्या जागेचा जो मालक आहे तो महानगरपालिकेला तेवढी मुतारी बांधून द्यायला तयार आहे. ती खाजगी जागा बाधित होऊ नये या दृष्टीकोनातून त्यांचा आलेल्या विनंती अर्जाचा आपण विचार करुन हा निर्णय घेत आहोत.

**रतन पाटील :-**

तो जर खाजगी मालक मुतारी बांधून देत असेल तर प्रश्नच येत नाही.

**प्रकरण क्र. १०८ :-**

राई येथील सार्वजनिक मुतारी हटविणेबाबत.

**ठराव क्र. ११४ :-**

राई येथे जुना सर्व्हे नं. २१८, नविन सर्व्हे नं. २, हिस्सा नं. १ ही जमीन टी.आय.एल.आर. यांनी केलेल्या सर्व्हेनुसार लक्ष्मीबाई काशिनाथ पाटील यांच्या मालकीची असून सदर जागेत असलेली महानगरपालिकेची मुतारी मोडकळीस आलेली आहे. तरी सदर जागेतील मुतारी तोडण्यास व उपलब्ध जागे नुसार इतर ठिकाणी बांधण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. गजानन भोईर.** **अनुमोदन :- श्री. रमेश जैन.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १०९ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य श्री. सुर्यकांत भोईर ह्यांनी प्रकरण क्र. १०९ चा ठराव सभागृहात मांडला.)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मिलन पाटील :-**

अध्यक्ष साहेब, या विषयाबाबत मी सुचना करु इच्छितो की, भाईंदर पश्चिमेला भाईंदर सेकंडरी शाळा आहे. १६, १७, १८ जी शाळा पडली होती, त्यावेळी भाईंदर सेकंडरीने त्यांना वर्ग दिले होते व त्यांचे वर्ग आपण भरवत होतो. आता सद्य परिस्थिती अशी आहे की, भाईंदर सेकंडरीला दोन वर्ग कमी पडतात.

आम्हांला १६, १७, १८ मधून कुठलेही दोन वर्ग देण्याची आम्ही तुम्हांला विनंती करतो. ते आपण ह्या ठरावामध्ये समाविष्ट करुन घ्यावे.

**रतन पाटील :-**

पुढच्या सभेत विषय येऊ दे. ही शैक्षणिक बाब आहे व त्याला आम्ही जरासुद्धा विरोध करणार नाही.

**मिलन पाटील :-**

ह्याच्यातले वर्ग उपलब्ध असले तर आम्ही मागितले आहेत.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटीलजी ह्यांची सुचना घेत आहोत व त्याचबरोबर सन्मा. सदस्य रतन पाटीलजी आपण आपली सुचना मांडावी.

**केशव घरत :-**

सभापती साहेब, मी बोलतो नंतर आपण त्यांना बोलायला द्या.

**मा. सभापती :-**

ठिक आहे.

**केशव घरत :-**

२५१/- रुपये भाडे प्रति महिना ते द्यायचे आहे. परंतु, माझे असे म्हणणे आहे की, आपली जी महापालिकेची नऊ नंबरची शाळा आहे, घोडबंदर येथील, ही शाळा शिक्षण उत्तेजक मंडळाच्या मालकीची होती आणि सदर शाळेची इमारत संपुर्ण काही मोबदला न घेता शिक्षण उत्तेजक मंडळाने महापालिकेला हस्तांतरित केलेली आहे. माझे असे म्हणणे आहे, या संदर्भात आपण विचार करुन काही कामांना जास्तीत जास्त तीन वर्षाकरिता केलेले व जास्तीत जास्त एक किंवा दोन वर्षे लागणार आहे आणि आमच्या ह्या विनंतीचा विचार व्हावा. ती जी शाळा आहे तर विनंती आहे की, भाडे घेऊ नये.

**गजानन भोईर :-**

जर भाडे घेतले नाही तर त्याला काही तथ्य राहणार नाही.

**मा. सभापती :-**

भाडे असायला पाहिजे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

रु. १५१/- करा.

**रतन पाटील :-**

साहेब, शैक्षणिक बाबतीमध्ये कुठल्याही शैक्षणिक विषयाला आम्ही विरोध करणार नाही. मला पहिले वाटले, आपण तशाच पद्धतीने ह्या मंडळाला खोल्या देत आहोत. तसे न करता जर आपण भाडे आकारुन त्यांना देत आहात ही चांगली गोष्ट आहे. मी त्याचे स्वागत करतोय. पण ते किती वर्षासाठी देत आहोत. आपली महापालिकेची शाळा ती जर लागली ते आपल्याला परत किती वर्षानी मिळणार त्याचा समावेश अटीशर्तींमध्ये घालण्यात यावा.

**सुर्यकांत भोईर :-**

तीन वर्ष लिहिलेले आहे व जेव्हा आपल्याला गरज लागेल तेव्हा ते खाली करुन देतील.

**केशव घरत :-**

तीन वर्ष एवढा कालावधी लागणार नाही.

**मा. सभापती :-**

प्रकरण क्र. १०९ चा ठराव सर्वानुमते मंजुर करण्यांत येत आहे.

**गजानन भोईर :-**

सभापती साहेब, विषयामध्ये विषय आला म्हणून सांगतो काल आमच्या येथे प्रभाग क्र. ०३ ची सभा होती. तिथे ते दृश्य पाहायला मिळाले अर्ध्या जागेत प्रभाग समितीचे ऑफीस व अर्ध्या जागेत शाळा भरलेली होती. पण ते बरोबर दिसत नाही. जर कोणी अधिकारी आले एवढी महानगरपालिकेची जागा त्याच्यावर आपण विचार करुन पर्याय काढायला पाहिजे अर्ध्या जागेत शाळा व अर्ध्या जागेत ऑफीस. त्यामुळे ना शाळेत मुलांना शिकवू शकत ना ऑफीस चालवू शकत नाही.

**मा. सभापती :-**

सभेनंतर या विषयावर चर्चा करायला वेळ देण्यात येईल.

**रतन पाटील :-**

त्या बिल्डींगमध्ये वर आणि खाली तिसऱ्या माळयावर रुम रिकामी आहे. तशापदधतीने जर विभागणी होत असेल तर त्या पद्धतीने काम करुन घ्या.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य गजानन भोईरजी, सन्मा. सदस्य रतन पाटीलजी यांनी जो विषय सभेसमोर मांडला. प्रभाग समितीच्या कार्यालया करिता आपण बजेटमध्ये तरतुद केलेली होती आणि आपला असा मनोदय होता

की, जी खारीगाव शाळा नविन बांधलेली आहे. त्या इमारतीचे कन्स्ट्रक्शन जुने आहे आणि नविन इमारत पायलिंग आहे. तर आपले चांगले सुसज्ज ऑफीस मिडलला राहणार आहे, भाईंदर पुर्वेमध्ये, गोडदेव, नवघर, खारीगांव ह्या सगळ्यामध्ये मिडलला राहणार आहे. आपण तिथे जर चांगले कार्यालय बांधणार आहोत, ह्याच्यामध्ये आपण ज्या काही गैरसुविधा सुचविल्या त्या गैरसुविधा दुर करु आणि नविन कार्यालय बांधण्याचे काम लवकरात लवकर सुरु करु.

**प्रकरण क्र. १०९ :-**

राजा शिवाजी विद्यालयाच्या आवारातील महानगरपालिकेच्या अखत्यारीतील असलेल्या दोन खोल्या शिक्षण उत्तेजक मंडळ यांस वापरास देणेबाबत.

**ठराव क्र. ११५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत घोडबंदर येथे राजा शिवाजी विद्यालयाजवळ महानगरपालिकेची जुनी शाळा इमारतीचे वर्ग आहेत. सदर वर्ग रिकामी आहेत. घोडबंदर येथे तत्कालीन नगरपरिषद असतांना नविन शाळागृह इमारत बांधण्याकरीता जुनी शाळा तोडली असता शिक्षण उत्तेजक मंडळ यांनी नगरपरिषद शाळा करीता भाड्याने वर्ग उपलब्ध करुन दिलेले होते. तरी शिक्षण उत्तेजक मंडळ यांना महानगरपालिकेच्या दोन खोल्या रु. २५१/- प्रति महिना या दराने करारनामा करुन तीन वर्षाकरीता उपलब्ध करुन देण्यास मान्यते करीता मा. महासभेपुढे शिफारस करण्यात येत आहे. तसेच भाईंदर शाळा क्र. १६, १७, १८ मधील दोन खोल्या नाममात्र भाड्याने भाईंदर सेकंडरी शाळेस देण्यास शिफारस करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. सुर्यकांत भोईर.** **अनुमोदन :- श्री. ध्रुवकिशोर पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ११० चे वाचन केले.)

**मा. सभापती :-**

सचिवजी प्रकरण क्र. ११० हा प्रकरण क्र. १११ व ११२ झाल्यानंतर घेण्यांत यावा.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १११ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य श्री. केशव घरत ह्यांनी प्रकरण क्र. १११ चा ठराव सभागृहात मांडला.)

**सुर्यकांत भोईर :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**रतन पाटील :-**

सभापती साहेब, सदर विषयाचा आपण गोषवारा का दिलेला नाही?

**गजानन भोईर :-**

सभापती साहेब, या विषयाला आमचा विरोध नाही. पण मागच्या वेळेस मी असा उल्लेख केला होता. या नविन कामामध्ये एम.आय. ते खाडीपर्यंत जो नाला आहे तो घेण्याकरिता मागच्या सभेमध्ये बोललो होतो की, आपण केबिन रोड पाहिला असेल, तुमचा प्रभाग. नर्मदा नगर येथे कमीत कमी कमरेपर्यंत पाणी भरले होते. हा विषय आपण घ्यायला पाहिजे होता. नविन जे गटाराचे काम घेतो आणि बोलता-बोलता पावसाळा येईल. काम करतांना टिपण करा असे माझे म्हणणे आहे. आपण महासभेला करता, पण हा विषय देखील एम.आय. ते मेन गटार घ्या.

**मा. सभापती :-**

साहेब, कामामध्ये ते गटार घेतलेले आहे.

**गजानन भोईर :-**

तीन वर्ष झाली आपण ते ऐकत आहोत.

**मा. सभापती :-**

त्या गटाराचे काम घेतलेले आणि ह्या विषयाला महासभेला शिफारस केली व मा. महासभेने त्याला मंजुरी दिलेली आहे. सदरचा विषय मंजुरीकरिता मा. महासभेसमोर पाठवित आहोत आणि आपण जे बोलता तो विषय मंजुर आहे.

**गजानन भोईर :-**

ते काम कधी सुरु होईल.

**मा. सभापती :-**

ते प्रशासनाचे काम आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, त्याचबरोबर आज जी पुरस्थिती निर्माण झाली, ती का झाली हे आपल्याला माहिती आहे. वीस कोटी कुठे कुठे खर्च करणार आहात?

**मा. सभापती :-**

आपण जो आढावा घेत आहोत, त्याच्यात ते सर्व येईल.

**रतन पाटील :-**

आज मिरा भाईंदरमध्ये जी पुरपरिस्थिती निर्माण झालेली आहे. त्या पुरपरिस्थितीवर नियंत्रण करण्यासाठी आपण ते पैसे तिथे वापरले पाहिजे. एकात्मतेने नाले योजना राबवायला पाहिजे, त्याच्यावर आपण विचार विनिमय करत नाही. आज जे अरुंद नाले झालेले आहेत. ती पुरपरिस्थिती त्याकरिता निर्माण झाली. ज्या नऊ लोकांचे प्राण गेले आणि करोडो रुपयाची वित्तहानी झाली, ती कशामुळे झाली हे आपल्याला माहिती आहे. मी सांगणे गरजेचे नाही. पण त्या पुरपरिस्थितीवर आता आपल्याला मात करायची आहे आणि त्याच्यावर कशा प्रकारे मात करणार? जेवढे नाले आहेत ते नाले एकात्मतेने रुंद करण्याचे, मोठे करण्याचा असा कार्यक्रम आणि ठराव करा. तसा विषय विषयपटलावर आणून तो घ्या आणि आपल्याला जे जकातीचे पैसे आलेले आहे ते त्याच्यामध्ये वापरा. कुठेतरी ह्या महानगरपालिकेचे चांगले करा व परत पुरस्थिती पुन्हा येऊ नये ह्याकरिता प्रथम प्राधान्य त्यांना द्या. रस्ते आहेत, रस्ते बंद नाही, चांगले रस्ते आहेत. पण ही जी पुरपरिस्थिती निर्माण झाली त्याकरिता आपण प्रथम प्राधान्य द्या.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य रतन पाटीलजी आपल्या सुचनांचा जरुर विचार केला जाईल.

**प्रकरण क्र. १११ :-**

घोडबंदर जकात नाका ९ ते गोवळा देवी मंदिर रस्त्याचे पुर्नपृष्ठीकरण करणे.

**ठराव क्र. ११७ :-**

राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ वर घोडबंदर गावात जाणारा जकात नाका क्र. ९ ते गोवळादेवी मंदिर पर्यंत विकास आराखड्यात १८.०० मी. रुंदीचा रस्ता असून सदर रस्त्यावरुन टाटा कंपनी, टेलिफोन, रिलायन्स, गॅस ऑथरीटी, रिलायन्स इन्फोटेक यांच्या केबल, तसेच महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागामार्फत जलवाहिन्या टाकणे कामी, डक्टींग करीता गेल्या आठ वर्षात मोठ्या प्रमाणावर खोदाई झाल्याने सदर रस्ता हा नादुरुस्त आहे. तसेच पावसाळ्यात डोंगराचे पाणी रस्त्यावर साचून पाण्याचा निचरा न झाल्याने रस्ता उखडला आहे. सदर रस्त्याचे जकात नाका क्र. ९ ते गोवळादेवी मंदिर व पुढे वर्सोवा नाक्यापर्यंत मजबुतीकरण व संपूर्ण डांबरीकरण करणे आवश्यक असून त्याकरीता रु. १,९४,७८,५००/- रकमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदर खर्च या वर्षी जकात करापोटी जमा झालेल्या रकमेतून करता येईल; तरी सदर कामी तरतुद उपलब्ध करुन घेऊन प्रशासकीय व आर्थिक मान्यतेकरीता अंदाजपत्रक मा. महासभेपुढे शिफारस करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. केशव घरत.** **अनुमोदन :- श्री. सुर्यकांत भोईर.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ११२ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य श्री. सुर्यकांत भोईर ह्यांनी प्रकरण क्र. ११२ चा ठराव सभागृहात मांडला.)

**केशव घरत :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, जकातीचे आलेले पैसे तिथेच खर्च करायचे आहे का? आम्हांला असे बोलायचे आहे की, अन्य विभाग नाही का की, सगळे पैसे तिथेच वापरायचे आहे.

**मा. सभापती :-**

पुढे विषय आहे त्यावेळी त्या विषयावर आपण बोला.

**प्रकरण क्र. ११२ :-**

कृष्णस्थळ देवकी बिल्डींग १२ ते अमर पॅलेस हॉटेपर्यंत रस्त्याचे पुर्नपृष्ठीकरण करणे.

**ठराव क्र. ११८ :-**

राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ वर कृष्णस्थळ देवकी बिल्डींग क्र. १२ ते अमर पॅलेस हॉटेल पर्यंत रस्ता महानगरपालिकेमार्फत रुंद करण्यात आलेला आहे. सदर रस्ता गेल्या पाच वर्षात जलवाहिन्या, रिलायन्स कंपनीचे केबल्स, टेलिफोन कंपनीचे केबल्स, टाकण्याकरीता तोडण्यात आलेले आहेत. सदर रस्त्यास व्यवस्थित रीत्या उतार नसल्याने सर्व पावसाचे पाणी रस्त्यावर साचून दुर्गंधी पसरते. सदर रस्त्याचे मजबूतीकरण करुन डांबरीकरणे करणे आवश्यक आहे. सदर कामी रु. ४०,३१,०००/- एवढ्या रकमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून जकात करापोटी जादा रक्कम महानगरपालिका निधीत जमा झालेली असून सदर निधीतून वरील काम करण्याकरीता आवश्यक ती कार्यवाही करण्यास व प्रशासकीय आर्थिक मान्यता येत आहे.

**सुचक :- श्री. सुर्यकांत भोईर. अनुमोदन :- श्री. केशव घरत.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ११० चे वाचन केले.)

**कैलासबेन जानी :-**

साहेब, एकदा हा विषय येऊन गेलेला आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, उपहारगृहाचे टेंडर परत काढणार आहोत का, मागे ज्या निविदा आलेल्या आहेत ते घेणार आहोत?

**रतन पाटील :-**

सभापती साहेब, ह्या अगोदर हा विषया आला होता, या संदर्भात त्या वेळेला निविदा काढल्या होत्या व त्या निविदा उघडल्या गेल्या. दोघांच्या समसमान निविदा होत्या. त्याबाबत आपण ठोस निर्णय घेतलेला नाही. माझ्या मते आपण अशा पद्धतीने करायला पाहिजे होते. दोन्ही पार्टींना समोरासमोर बसवून बंद चिठ्ठ्या टाकायचे, त्या चिठ्ठ्या उचलून त्यांना ते द्यायला पाहिजे होते किंवा परत फेरनिविदा काढायला पाहिजे होती. पण आपण तसे न करता त्याच्यात चार ते पाच महिने वाया गेलेले आहेत आणि त्यामध्ये मिरा भाईंदर महानगरपालिकेचे नुकसान झालेले आहे. तरी आज आपण त्याच्यावर ठोस निर्णय घेणार आहात का?

**केशव घरत :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील साहेब दोन निविदा आलेल्या होत्या व त्यापैकी एक निविदा सध्या जे उपहारगृह चालवतात त्यांचीच आहे व ती दुसऱ्या नावाने आलेली आहे. पण त्यांना आपल्याला द्यायचेच नाही तर त्यांची निविदा कशाकरिता मंजुर करायची?

**रतन पाटील :-**

साहेब, मी कोणाला ओळखत नाही. त्या निविदाधारक कोण आहे? मला कोणाशी देणं-घेणं नाही.

**केशव घरत :-**

साहेब, आपण नसताना हा विषय स्थायी समिती समोर अगोदर आला होता. म्हणून आम्हांला माहिती आहे.

**रतन पाटील :-**

सभापती साहेबांना बोललो, हा विषय आपल्यासमोर आलेला होता. आपण वेगळं ऐकले होते का?

**गजानन भोईर :-**

ठेका कोणाला दिला, कोणी दिला त्याच्याशी कर्तव्य नाही. एक लहानसा विषय पाच ते सहा वेळा समितीसमोर येतो. स्थायी समितीसमोर भरपूर कामे आहेत, मिरा भाईंदरमध्ये करण्यासारखी. एक साधा विषय आहे, महानगरपालिकेतील उपहारगृहाचा विषय आहे. त्याचा आपण निर्णय घ्या आणि ते उपहारगृह चालवायला आपण कोणालाही द्या. आम्हांला त्याच्याशी कर्तव्य नाही.

**रतन पाटील :-**

साहेब, या संदर्भात आयुक्तांबरोबर चर्चा झाली का?

**कैलासबेन जानी :-**

एकदा विषय मंजुर केलेला आहे. परत परत विषय कशाला येतो? साहेब, एक विषय असा दोन वेळा येऊ शकतो का?

**रतन पाटील :-**

साहेब, फेर निविदा काढा. कशाला विषय टांगणीला ठेवता? आपण परत फेर निविदा काढा. आपल्याला अधिकार आहेत ना?

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य केशवजी घरत, गजानन भोईरजी व रतन पाटीलजी ह्यांनी ह्या विषयावर चर्चा केली व सन्मा. सदस्या कैलासबेन जानी ह्यांनीही सांगितले की, हा विषय पुन्हा आपल्याकडे आलेला आहे आणि हा विषय याकरिता घेतला की, एकदा तो ठराव झाल्यानंतर अजुनपर्यंत त्या ठरावावर इम्प्लीमेन्ट झालेले नाही. प्रशासनाकडून म्हणून हा विषय पुन्हा स्थायी समितीसमोर आणलेला आहे. ह्या बाबतीमध्ये लेखापाल आपले काय मत आहे, ते व्यक्त करा.

**सुधिर नाकाडी :-**

स्थायी समितीने तो विषय मंजुर केलेला आहे. पण अजून तो ठराव इम्प्लीमेंट झालेला नाही.

**गजानन भोईर :-**

आम्ही ठराव मंजूर करुन दिला तो परत स्थायी समितीसमोर आणण्याचा विषय येतच नाही.

**कैलासबेन जानी :-**

त्या दोन्ही ठेकेदारांना बसवून समाधान करायला पाहिजे. परत परत तोच विषय कशाला आणायचे?

**मा. सभापती :-**

हा विषय आपण आणलेला आहे, प्रशासनाने ठराव करुनसुद्धा त्याचे इम्प्लीमेंन्टेशन केले नाही. म्हणून हा विषय आपण पुनश्चः घेतलेला आहे. प्रशासनाने विषय पुन्हा आणला नाही. प्रशासनाने का इम्प्लीमेंट केले नाही ह्याबाबत खुलासा आपण प्रथम करावा. टेक्निकल अडचण काय आहे?

**कैलासबेन जानी :-**

हा एवढा छोटा विषय आहे. जर मोठा विषय असेल आणि तो परत परत आला तर स्थायी समितीची काय अवस्था होणार?

**मा. सभापती :-**

म्हणूनच आपण प्रशासनाकडून खुलासा मागत आहोत.

**गजानन भोईर :-**

आपण जो ठराव मंजुर करुन दिला होता त्याच्यावर त्यांची टिपणी काय आहे? त्याच्यावर त्यांचा खुलासा काय आहे ते सांगावे.

**कैलासबेन जानी :-**

एकच विषय स्थायी समितीसमोर कितींदा आणू शकतो?

**विजय पाटील :-**

ठराव क्र. ३० बाबत जो उपहारगृहाचा ठराव झालेला आहे, स्थायी समिती १३/०६/२००५, ठराव क्र. ३०, त्याबाबत निर्णय घेणेबाबत त्यावेळी मी अहवाल सादर केलेला होता. तत्कालिन आयुक्त साहेबांकडे त्यांनी त्याच्यावर मला कोणत्याही प्रकारचा निर्णय दिला नव्हता.

**गजानन भोईर :-**

जर तो ठराव एकदा स्थायी समितीमधून मंजुर होऊन गेल्यानंतर परत तो विषय स्थायी समितीसमोर का आणला? त्यांनीच त्याचा निर्णय घ्यावा.

**विजय पाटील :-**

प्रशासनाचे असे मत होते की, त्यांनी त्या दोघांना चर्चेसाठी बोलावले होते. त्यावेळी एक ठेकेदार वेळेत चर्चेला आला नाही आणि दुसरा ठेकेदार उशिरा आला. त्यामुळे जो पहिला ठेकेदार आलेला आहे तो वेळेमध्ये आल्यामुळे त्याला द्यावे.

**गजानन भोईर :-**

तसे त्यांनी सांगावे. आपण बोललात की, त्यांनी टिपणी दिलेली नाही.

**कैलासबेन जानी :-**

दोघांना बोलावून आयुक्तांकडे चर्चेला बसवा.

**केशव घरत :-**

विजय पाटील साहेब, जो पहिला ठेकेदार आलेला आहे त्याला स्थायी समिती सभागृहाचा विरोध आहे. त्याला तुम्ही ठेका कसे देणार?

**सुर्यकांत भोईर :-**

त्याला ठेका द्यायचा नाही.

**विजय पाटील :-**

ह्याबाबत जी स्वयंस्पष्ट टिपणी आयुक्त साहेबांकडे ठेवली होती, मला त्यावर काहीच निर्णय मिळाला नाही, तर मी काय करायचे?

**सुर्यकांत भोईर :-**

नविन निविदा मागवा.

**गजानन भोईर :-**

सदस्यांना न विचारता मुख्यालय किंवा सभापती साहेबांना निर्णय करण्याकरिता द्यावे. विजय पाटील, आपण परत हा विषय आयुक्त साहेबांकडे ठेवा आणि तिथेच निर्णय घ्या. हा विषय परत स्थायी समितीसमोर आणू नका.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्यांची चर्चा झालेली आहे की, उपहारगृहाचा जो ठराव झाला होता, त्या ठरावाप्रमाणे त्याची अंमलबजावणी झाली पाहिजे आणि त्या अंमलबजावणीकरिता सदरचा प्रस्ताव हा मिरा भाईंदर महानगरपालिकेचे आयुक्त साहेबांसमोर ठेवून त्या ठरावाचे इम्प्लीमेंटेशन करायचे आहे, असे मी रुलिंग देत आहे.

**प्रकरण क्र. ११० :-**

उपहारगृह ठेक्याबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. ११६ :-**

स्थाई समिती सभा दि. ३१/०८/०५ रोजी उपहारगृह ठेक्याबाबत विचार विनियम करुन निर्णय घेणेबाबत चर्चा झाली असता स्थाई समितीने ठराव क्र. ३०, दि. १३/०६/०५ रोजी आलेल्या ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी व ठरावांत नमूद केलेल्या ठेकेदारांस सदर ठेका देणेबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी. असे सर्व सदस्यांचे मत आहे. सदर बाब परत सभेपुढे येऊ नये. मा. आयुक्त सो. यांचेकडे ठरावासह प्रकरण पुन्हा सादर करावे असे रुलिंग देण्यांत येत आहे.

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १०६ व प्रकरण क्र. ११३ चे वाचन केले.)

**मिलन पाटील :-**

सभापती साहेब, हा अवलोकनार्थ विषय होऊ शकतो का? जो प्रकरण क्र. ११३ आहे हा अवलोकनार्थ विषय येऊ शकतो?

**सुर्यकांत भोईर :-**

हा विषय अवलोकनाला कसा येईल? हा विषय अवलोकनाला येऊ शकत नाही.

**मिलन पाटील :-**

आम्ही सभा त्याग करुन जातो. हा विषय अवलोकनार्थ येऊच शकत नाही. हा विषय आणला कोणी? एवढा मोठा विषय आहे. अहवाल सादर करायचा आहे. सभापती साहेब, आपण हया विषयावर आम्हाला रुलिंग दया. नाहीतर आम्ही सभा त्याग करतो.

**कैलासबेन जानी :-**

सभा पटलावर तो विषय आणायला पाहिजे होता तो विषय अवलोकनार्थ आपल्याकडे कसा आला?

**मिलन पाटील :-**

सभापती साहेब, हे जे विषय अवलोकनार्थ ठेवले आहे, हे प्रशासनाला मंजूर आहे का? त्याच्यावर एकाची सुद्धा सही नाही. हे आयुक्तांना/उपायुक्तांना मंजुर आहे का? ह्याच्यावर आपली सही आहे का? आपण आम्हाला नुसते हे दिले आहे. प्रशासनाने सांगावे की, आम्हाला मंजुर आहे.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

आम्हाला दाखवले नाही.

**मिलन पाटील :-**

आपल्याला दाखवले नाही. स्थायी समिती म्हणजे असेच आहे का? साहेब, हे अधिकारी हे प्रशासन सांगतात की, आम्हाला माहित नाही.

**गजानन भोईर :-**

प्रकरण क्र. १०६ च्या विषयाचा आढावा घ्यायचा आहे.

**मिलन पाटील :-**

प्रकरण क्र. १०६ चा विषय आहे. आपण त्याच्यातले दाखवा. आपण प्रशासनाला दाखवले नाही. साहेब आपण विचारा, प्रशासन तुमच्यासमोर नाही म्हणून सांगते. म्हणजे ह्याला आयुक्तांची किंवा उपायुक्तांची मान्यता आहे का नाही? आता ही मंजुरी आपण कशाची घेता?

**शरद बेलवटे :-**

अवलोकनार्थसाठी विषय आलेला आहे.

**मिलन पाटील :-**

एवढा मोठा विषय अवलोकनार्थसाठी का आणता? आपणच पार पाडायचे. अवलोकनाकरिता का आणता? ह्याच्यात आपण काय लिहिले आहे? आम्ही काय समजायचे? आपण ही जी आकडेवारी दिली आहे त्याच्याकरिता आम्ही कॅल्क्युलेटर घेऊन बसू का?

**सुर्यकांत भोईर :-**

हा विषय मा. महासभेकडे जाऊ दे. आपण जे दिले आहे त्याच्यामध्ये आम्हांला काय कळणार आहे?

**मिलन पाटील :-**

आपण आम्हांला कॅल्क्युलेटर आणून द्या. आम्ही आकडेमोड करतो आणि आपल्याला दाखवतो. वसुली काय झाली? ती वसुली ह्याच्यात कुठे आहे? बिलं कधी गेली आणि त्याच्यात वसुली किती झाली आहे? एवढीच वसुली झालेली आहे का?

**शरद बेलवटे :-**

होय.

**मिलन पाटील :-**

किती वसुली व्हायला पाहिजे?

**शरद बेलवटे :-**

वर्षभराचे अंदाजपत्रकाच्या तरतुदी.....

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटीलजी हा जो अकाऊंटचा विषय आपल्याजवळ आलेला आहे. या विषयावर प्रशासनाकडून आपण जी माहिती मागितली त्या माहितीनुसार उपायुक्त साहेबांनी आम्हांला सांगितले, आम्हांला ह्या विषयाची माहिती, अवगत नाही. त्या सविस्तर विषयावर त्यांच्या सह्या नाही. म्हणून हा विषय अवलोकनार्थ होऊ शकत नाही. हा विषय पुढच्या सभेत घेण्यांत यावा. हा विषय अवलोकनार्थ नाही.

**मिलन पाटील :-**

प्रकरण क्र. १०६ व प्रकरण क्र. ११३ हे दोन्ही विषय पुढच्या सभेत घेण्यांत यावे.

**मा. सभापती :-**

आता आपल्याला त्याचा आढावा घ्यायचा आहे.

**मिलन पाटील :-**

साहेब, मी ह्याबाबत ठराव मांडतो. कारण ही गंभीर बाब आहे. १०६ कलमामध्ये काय आहे?

(सन्मा. सदस्य श्री. मिलन पाटील ह्यांनी प्रकरण क्र. १०६ च्या ठरावाचे सभागृहात वाचन केले.)

**डॉ. रमेश जैन :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

कार्यवाही कडक लिहिले आहे. त्याच्यावर त्यांचे शेरे वगैरे होतील.

**मिलन पाटील :-**

शेरे होतील, पण त्यांनी आपल्याला जून महिन्यामध्ये हे द्यायला पाहिजे होते. जी पहिली सभा जून महिन्याची होईल तेव्हा त्यांनी आम्हांला द्यायचे पाहिजे. आपल्यासमोर त्यांनी दिले का? आपल्याला काय कल्पना असणार? त्यांनी आपल्याला अंधारात ठेवलेले आहे. वसुली किती झाली याबाबत आपल्याला काय माहिती आहे? बाकी किती आहे? बिले काही गेली आहेत का नाही? त्याचा अहवाल कुठे आहे?

**मा. सभापती :-**

त्यांनी जो त्रैमासिक आणले आहे त्याच्यामध्ये असेल.

**मिलन पाटील :-**

अहवाल कुठे आहे? त्यांनी फक्त आपल्याला आकडेवारी दिली आहे. ह्या आकडेवारीने आम्ही काय करायचे? आपण आम्हांला कॅल्क्युलेटर द्या.

**शरद बेलवटे :-**

हे फक्त अवलोकनार्थ आहे.

**मिलन पाटील :-**

हे अवलोकनार्थ होऊ शकत नाही. ह्या विषयावर चर्चा व्हायला पाहिजे. उद्या आपण वसुली केली. कोणत्या डिपार्टमेंटमधून वसुली केली आहे, नाही केली हे आम्हांला कसे समजणार?

**सुर्यकांत भोईर :-**

प्रत्येक डिपार्टमेंट वाईज आपण आम्हांला सविस्तर लेखी अहवाल द्या. किती खर्च झाले, किती बाकी आहे?

**सुधिर नाकाडी :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतोय, आता जे सन्मा. सदस्य मिलन पाटीलजी ह्यांनी बोलले त्याच्यामध्ये सध्या जे वार्षिक लेखे सादर करायचे असतात ते शक्य तितक्या लवकर स्थायी समितीसमोर सादर करायचे आहे आणि ते आम्ही सादर करणारही आहोत. त्याप्रमाणे गेल्या वर्षी आणि त्याच्या आदल्या वर्षी सादर केलेले आहेत. ह्या वर्षी विलंब का होत आहे? तर सध्या कर्मचारी वर्ग, सगळा स्टाफ दोन तीन महिन्यापासून पुरपरिस्थिती व आर्थिक गणनेसाठी स्टाफ काढून घेतलेला. त्यामुळे विलंब झालेला आहे आणि ते आम्ही सादर करणार आहोत. आता जो सध्या विषय आलेला आहे, हा विषय माहितीचा आलेला आहे. ह्याच्यानंतर सविस्तर रिकन्सीलेशन असणे किंवा ज्या बाबी आहेत, मत्ता, दायित्व ह्या ज्या गोष्टी आहेत त्याची तपासणी सुरु आहे आणि त्याच्यानंतर अंतिम लेखे आपल्या मंजुरीसाठी येणार आहेत. आता आम्ही तुम्हांला जे दिले ते ॲक्चुअल गेल्या वर्षी किती जमा झाले? दोन कोटी केले असेल, त्यापैकी दिड कोटी जमा झाले. हे जमा फक्त आपल्या माहितीकरिता दाखविले आहेत. चुकीचे काय झालेले नाही. आढावा घेण्यासाठी हे आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

सविस्तर द्या.

**सुधिर नाकाडी :-**

साहेब, सविस्तर आणखीन लेखे येणार आपल्यासमोर, अंतिम मंजुरीकरिता.

**मिलन पाटील :-**

ही घटना २६ जुलै रोजी घडलेली आहे. २६ जुलैनंतर पाच दिवसाची, सात दिवसाची, आठ दिवसाची अन्यथा दहा दिवस धरा. १०६ कलममध्ये काय आहे? मार्च महिन्यामध्ये वर्ष संपते. त्यानंतर एप्रिल, मे, जुन व जुनची जी पहिली सभा होईल.......

**सुधिर नाकाडी :-**

कलम १०६ मध्ये जुन महिन्यामध्ये म्हटलेले नाही. लवकरात लवकर असे म्हटले आहे.

**मिलन पाटील :-**

१०६ कलममध्ये पहिल्याच ओळीमध्ये म्हटले आहे. जुन महिन्यामध्ये नाही म्हणजे सहा महिन्यांनी समोर आणणार का?

**सुधिर नाकाडी :-**

लवकरात लवकर म्हणजे स्टाफ उपलब्ध असला पाहिजे.

**मिलन पाटील :-**

सहा महिन्याने जी पहिली सभा घेणार त्यामध्ये घ्यायचे असते.

**सुधिर नाकाडी :-**

दोन माणसे असणार तर आम्ही कसे देणार? सभापती साहेब, प्रशासनाकडे आम्ही दहा माणसांची मागणी केलेली आहे आणि आम्ही लेखे, अहवाल आपल्यासमोर ठेवणार आहोत.

**मिलन पाटील :-**

आपण जुन महिन्यामध्ये द्यायला पाहिजे. जुन महिन्यामध्ये आपण दिले का? जास्तीत जास्त किती उशीर करु शकता? कुठल्या खात्यामध्ये किती बॅलन्स आहे? कुठले पैसे आपण कुठे वर्ग केलेले आहेत? बजेट आम्ही बनवणार आहोत, तुम्ही बनवले बजेट. तुम्ही आम्हांला बजेटची माहिति द्यायला पाहिजे. बजेट आम्ही बनवलेले आहे. आम्ही जर बजेटमध्ये उद्या अंधारात राहिलो व बजेट कोलमडले तर अध्यक्ष साहेबांची व आमची नामुष्की होईल. जाब आम्हांला विचारणार, तुम्हाला विचारणार आहे का? ऑडीटर कोण आहे? आपण आम्हांला माहिती दिली का, कलेक्टरने सहा कोटी रुपये वर्ग केलेले आहे, ह्याची आपण आम्हांला माहिती दिली. सन्मा. सदस्यांना कोणाला माहिती आहे का? स्थायी समितीच्या सहा कोटी रुपये कलेक्टरने दिलेले आहे, ह्याची तुम्हांला माहिती दिली का?

**प्रेमनाथ पाटील :-**

माहिती दिली नाही.

**मिलन पाटील :-**

त्यांनी माहिती दिली नाही. ही जबाबदारी कोणाची आहे? आपल्या बजेटमध्ये जर सहा कोटीचा फरक आला तर हयाला जबाबदार कोण? म्हणजे आम्ही बजेट करायचा, मग आमच्याकडे कशाला आणायचे? तुम्हाला गर्व्हमेंटने नेमले आहे ना! आम्ही तुम्हाला पगार देतो, तुम्ही करा.

**केशव घरत :-**

सभापती महोदय, कशासाठी सहा कोटी रुपये दिले आहे आणि कोणाच्या परवानगीने दिलेले आहे?

**मिलन पाटील :-**

आतापर्यंत मुख्य लेखापरिक्षकाने जो रिमार्क मारलेला आहे. ते रिमार्क आपण सादर केले का?

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटीलजी सहा कोटी रुपयांची माहिती देतो.

**सुर्यकांत भोईर :-**

कलेक्टर ऑफीसला सहा कोटी रुपये महापालिकेने कशाचे अदा केलेले आहेत?

**मा. सभापती :-**

सहा कोटी रुपये आपण समोरुन अदा केलेले नाही. मिरा भाईंदर महानगरपालिकेला शासनाकडून ज्या ग्रँट येतात ते त्यांनी परस्पर वर्ग केल्या. नगरभवन जो महापालिकेचा तलाव आहे, त्या तलावामध्ये आपण जी प्रशासकीय इमारत बांधलेली आहे, ती जागा कलेक्टर जागा असल्या कारणाने त्यांनी आपल्याकडे पैशांची मागणी वारंवार केली होती आणि आपण त्यांना सांगितले की, आम्ही लोकोपयोगी, समाज उपयोगी, लोकांसाठी बांधलेले आहे. आम्ही आमच्यासाठी बांधलेले नाही. कलेक्टरनी आम्हांला सांगितले की, आमच्या जागेवर आपण आपली इमारत बांधलेली आहे. त्याचे तुम्ही पैसे द्यावेत, असे पत्र दिले होते व आपल्या ज्या ग्रँन्टस् येतात त्या ग्रँन्टस् वेळोवेळी येत नाही. आपल्या ह्या वर्षीची ग्रँन्ट पुढच्या वर्षी मिळते व त्याच्या पुढच्या वर्षीची ग्रँन्ट चौथ्या वर्षी मिळते. अशा पद्धतीची जी आपली थकबाकी होती, ती थकबाकी त्या लोकांनी वर्ग करुन घेतली. त्या पद्धतीचे तसे पत्र मी स्वतः मा. पालकमंत्री श्री. गणेश नाईक साहेबांना जनता दरबारामध्ये दिलेले आहे की, आमची महापालिका आर्थिक दृष्ट्या एवढी सक्षम नाही. त्यामुळे जर आपण एवढे पैसे एकत्र कापलेत तर आम्हांला काम करणे मुश्किल होणार आहे. याबाबत मी स्वतः जिल्हाधिका-यांबरोबर बोललो की, आपण ह्याचा विचार करा. ही महानगरपालिका एवढी सक्षम नाही. आपण विचार करा. तुमच्या जागेचे पैसे द्यायला आम्ही तयार आहोत. परंतु, हे पैसे आपण टप्प्याटप्प्याने कापा.

**केशव घरत :-**

साहेब, महापालिका ही सुद्धा सरकारचे एक अंगच आहे ना?

**रतन पाटील :-**

आपण महापालिकेचे शिष्टमंडळ घेऊन कलेक्टरकडे जाऊ या.

**मिलन पाटील :-**

सभागृहाला माहिती देणे हे कोणाचे काम आहे? आपण लेखापरिक्षक आहात, आपण आम्हांला माहिती द्यायला पाहिजे होती. आज सहा कोटीचा प्रश्न आहे. उद्या जर आमच्या बजेटवर त्याचा परिणाम झाला तर?

**केशव घरत :-**

महापालिका ही सुद्धा सरकारचे अंग आहे. कलेक्टर जागेवर इतर ठिकाणी ज्या झोपड्या वसलेल्या आहेत त्यांच्याकडून वसुली केली जाते का? हादेखील प्रश्न आहे. अशी कलेक्टर जागा कितीतरी लोकांनी खाल्लेली आहे. त्यांच्याकडून पैसे वसुल केले जातात का? आणि आपण समाज उपयोगी काम करत आहोत.

**मिलन पाटील :-**

जिल्हाधिका-यांकडे कलम ३७ खाली प्रस्ताव पाठवलाच असता ना! अगोदर जर प्रशासनाने सांगितले असते तर आपण ३७ खाली प्रस्ताव पाठवला असता. आपण ३७ खाली इतर जागा घेतल्या आहेत व तो आपला अधिकार आहे.

**रतन पाटील :-**

त्याच्यावर आता निर्णय काय?

**मा. सभापती :-**

कलेक्टर साहेबांचे आपल्याला अजून अधिकृतरित्या पत्र मिळालेले नाही, ही वस्तुस्थिती आहे. पेपरला बातमी आली व त्याची छायाप्रत आपल्याला मिळाली.

**मिलन पाटील :-**

ह्यावर ह्याचा पत्रव्यवहार काय झाला? त्यांनी नाही दिले. समजा त्यांची चुक आहे व तुमचा पत्रव्यवहार केला. पेपरमध्ये अशी बातमी आलेली आहे. आमच्याकडे आपण अजुन रक्कम अदा केली नाही, त्याचे काय? तुम्ही त्यांच्याशी काय पत्रव्यवहार केला तो दाखवा. त्यांनी आपल्याला लेखी उत्तर दिले असते.

**मा. सभापती :-**

प्रकरण क्र. ११३, सन २००४-०५ जमा खर्चाबाबत अवलोकनार्थ सादर व प्रकरण क्र. १०६, सन २००५-०६ अंदाजपत्रक विभागवार आढावा घेणे, हा विषय सविस्तर टिपणी, गोषवा-यासह आम्हांला पुढच्या सभेत आणण्यांत यावा.

**मिलन पाटील :-**

सभापती साहेब, मी जो ठराव मांडला आहे, त्या ठरावावर आपण रुलिंग द्या की, ठराव मंजुर आहे, अशी विनंती करतो.

**गजानन भोईर :-**

साहेब, अंदाजपत्रकावर काय निर्णय झाला?

**मा. सभापती :-**

प्रकरण क्र. ११३ वर ठराव केला, अवलोकन कॅन्सल करुन आणि प्रकरण क्र. १०६, सन २००५-०६ अंदाजपत्रक विभागवार आढावा घेणे हा जो विषय आहे त्याच्यावर फेरवाईज गोषवारा मागितला आहे. जो खर्च अपेक्षित होता व खर्च किती झाला हा सविस्तर विषय पुढच्या सभेत घेण्यांत येईल.

**प्रकरण क्र. १०६ :-**

सन २००५-०६ अंदाजपत्रक विभागवार आढावा घेणे.

**ठराव क्र. ११२ :-**

मा. सभापती सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा विषय पुढील सभेत घेण्याचे ठरविण्यांत आले.

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रकरण क्र. ११३ :-**

सन २००४-०५ वार्षिक जमाखर्च अवलोकनार्थ सादर.

**ठराव क्र. ११९ :-**

मा. सभापती सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा विषय पुढील सभेत घेण्याचे ठरविण्यांत आले.

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ११४ चे वाचन केले.)

**प्रकरण क्र. ११४ :-**

मा. आयुक्त सो., यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (अग्निशमन विभाग)

**ठराव क्र. १२० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे अग्निशमन आणी बाणी सेवा ही अत्यावश्यक असल्याने सदरच्या विभागातील कर्मचाऱ्यासाठी लागणारे साहित्य खरेदी करण्यास मा. आयुक्त यांच्या मान्यतेने दि. ६/७/२००५ रोजी दै. वार्ताहर व दै. मुंबई संध्या या वृत्तपत्रात जाहिर फेर निविदा सुचना प्रसिद्ध करण्यांत आल्या होत्या. त्यात १) गमबुट २) हेल्मेट ३) रेनकोट (पॅन्टशर्ट) ४) विंटर जॅकीट (जर्शी) ५) फायर एक्स वुईथ पॉकेट वुईथ टेस्ट रिपोर्ट ६) लेदर वेस्ट वुईथ बल्कल इत्यादी.

यासाठी अ.क्र. १ साठी मे जोजफ लिसलीव्ह ॲन्ड कंपनी अ.क्र. २ ते ३ करिता मे. श्री. स्वामी समर्थ इंटरप्राईजेस, अ.क्र. ४ व ६ करिता मे. वोरा इंटरप्राईजेस व अ.क्र. ५ करिता मे. युनिकेअर एमरजन्सी प्रा.लि. यांचे दर सर्वात कमी व वाजवी होत्या त्या निविदा स्विकारण्यात आल्या आहेत.

वरील सर्व साहित्य खरेदी करणेसाठी ५,२४,२५०/- खर्च येणार आहे. त्यासाठी मा. आयुक्तांनी त्यास मंजुरी दिलेली आहे.

सबब उपरोक्त प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ७३(ड) नुसार स्थायी समिती मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील.** **अनुमोदन :- श्री. मिलन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ११५ चे वाचन केले.)

**सुर्यकांत भोईर :-**

सभापती साहेब, मला पशुसंवर्धन या विषयावर बोलायचे आहे.  आपण उत्तनला कोंडवाडा बांधलेला आहे.  तिथे कुत्रे घेऊन जाता आणि त्यांना नसबंदीचे इंजेक्शन देता का?

**एस्. एस्. पानपट्टे (मा. उपायुक्त सोा.) :-**

होय.

**सुर्यकांत भोईर :-**

आमच्या गावातून कुत्रे अजुनपर्यंत घेऊन गेलेले नाही.  प्रभाग क्र. १३ मध्ये कुत्रे पकडण्याची गाडी आलेली नाही.

**केशव घरत :-**

ही मोहिम केव्हापासून सुरु झाली?

**गजानन भोईर :-**

सभापती साहेब, माझा असा विषय आहे की, आपण पाहता जी दहिहंडी गेली, त्या दहिहंडीचा व्यवस्थित केबल चॅनलवर मुंबईमध्ये जसे प्रक्षेपण दाखविले जाते.  जेणेकरुन जिथे विसर्जन होते, तिथे गर्दी होत नाही.  आपल्याला विनंती आहे की, जे विसर्जन आहे ते आपण केबलवर लाईव्ह करुन दाखवावे.  जेणेकरुन ते लोकांपर्यंत जाईल.  असे गेल्या वर्षी दाखविले नव्हते म्हणून मी सांगतोय.

**मा. सभापती :-**

आपली इच्छा असेल तर लाईव्ह दाखवू व पुष्पवृष्टीही करु.

**एस्. एस्. पानपट्टे (मा. उपायुक्त सोा.) :-**

२००४, डिसेंबर महिन्यापासून चालू आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

२००४, डिसेंबर महिन्यापासून चालू आहे म्हणजे आज या मोहिमेला आठ-नऊ महिने झाले.

**एस्. एस्. पानपट्टे (मा. उपायुक्त सोा.) :-**

कुत्र्यांचे ऑपरेशन केलेले आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

ते आपण आम्हांला दाखवू शकाल का?  कुठल्या कुठल्या विभागातून कुत्रे पकडले आहेत.

**एस्. एस्. पानपट्टे (मा. उपायुक्त सोा.) :-**

त्याची रजिस्टरमध्ये नोंद आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

रजिस्टर मागवा.

**केशव घरत :-**

साहेब, आपण सांगितले की, २००४ डिसेंबरपासून ही मोहिम सुरु आहे.  पण आम्हांला त्याची माहिती २००५ जुलै महिन्यात झाली.

**एस्. एस्. पानपट्टे (मा. उपायुक्त सोा.) :-**

हा विषय स्थायी समितीसमोर आला होता.

**केशव घरत :-**

आपण ही मोहिम राबवायला सुरुवात केली.  तेव्हापासून कोणा नगरसेकवकांना ते माहितच नाही.

**एस्. एस्. पानपट्टे (मा. उपायुक्त सोा.) :-**

नगरसेवकांना माहिती आहे.

**केशव घरत :-**

कोणाला माहिती आहे, ते सांगावे.  स्थायी समितीचे एवढे नगरसेवक आहेत त्यांनी सांगावे की, आम्हांला माहित आहे.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य केशव घरतजी, मी आपल्या वक्तव्यामध्ये व्यत्यय आणतो.  प्रकरण क्र. ११० जो विषय होता त्याचे रुलिंग मी दिलेले आहे ते मी सभागृहासमोर वाचून दाखवतो.  स्थायी समिती सभा दि. ३१/०८/२००५ रोजी उपहारगृह ठेक्याबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे बाबत चर्चा झाली असता स्थायी समितीने ठराव क्र. ३०, दि. १३/०६/२००५ रोजी आलेल्या ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.  ठरावात नमुद केलेल्या ठेकेदारास सदर ठेका देणेबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी असे सर्व सदस्यांचे मत आहे.  सदरहू बाब पुन्हा स्थायी समिती समोर विषय येऊ नये.  मा. आयुक्त साहेब ह्यांच्याकडे ठरावासह हे प्रकरण पुन्हा दाखल करावे व त्यावर कार्यवाही करण्यांत यावी असे मी रुलिंग देत आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, आमच्या प्रभागामध्ये कुठेही कुत्रे उचलले गेले नाही.  कुत्र्यांच्या संख्येत प्रचंड वाढ झालेली आहे.  लोक रात्री चालत जात असतांना, ते कुत्रे मागून येतात व चावतात.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य सुर्यकांत भोईरजी आपले म्हणणे बरोबर आहे. कुत्र्यांची भरपूर संख्या आमच्या प्रभागात ही आहे. पण आपण कुत्रे मारत नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, कुत्रे मारत नाही पण कुत्र्यांच्या नसबंदी करता आमच्या प्रभागातून कुत्रे घेऊन गेलेले नाही.

**मा. सभापती :-**

पानपट्टेजी, जर कुत्रे पकडून घेऊन गेले नसतील तर आपण ताबडतोब कुत्रे घेऊन जा.

**प्रकरण क्र. ११५ :-**

मा. आयुक्त सो., यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (पशुसंवर्धन विभाग)

**ठराव क्र. १२१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत शिरे गावठण उत्तन येथे मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करणेसाठी प्रकल्प चालू आहे.

सन २००५-०६ या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पात तरतुद करण्यांत आली आहे. सदर कामी महानगरपालिकेने दि. २८/१०/०४ रोजी जाहीर फेर निविदा मागवुन मे. ॲनिमल वेल्फेअर सोसायटी, अंबरनाथ (पुर्व) यांची प्रती श्वान ९५०/- ची निविदा सर्वात कमी दराची व वाजवी असल्याने स्विकारण्यात आली आहे.

मे. ॲनिमल वेल्फेअर सोसायटी, अंबरनाथ (पुर्व) यांनी सदरच्या प्रकल्पात गुंतवणूक केलेली आहे. व १० लाखाच्या आत खर्च करण्यांस मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेली आहे.

तरी त्याकामी येणारे देयक अदा करणेस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार वरील प्रकरण मा. स्थायी समिती मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. रमेश जैन.** **अनुमोदन :- श्रीम. कैलाशबेन जानी.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ११६ चे वाचन केले.)

**प्रकरण क्र. ११६ :-**

मा. आयुक्त सो., यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**ठराव क्र. १२२ :-**

imara¹Baa[-Mdr mahanagarpailaka h_It kravayaacaI KalaIla kamao ijalha majaUr saaosaayaTImaaf-t k$na GaoNyaat maa.Aayau@t yaaMnaI maMjaUrI idlaolaI Aaho.

| **A.Ë.** | **kamaacao naava** | **AMdaijat Kca-** | **ijalha majaUr saaosaayaTIcao naava** |
|---|---|---|---|
| 1 | Baa.p.p`.Ë.5¸ 16¸ 21 va 26 maQaIla gaTaro naalao va raoD ËaosaIMga va %yaavarIla JaakNao du$stI krNao. | $.4¸96¸950 À¹ | mao.saMtkRpa majaUr kamagaar sahkarI saMsqaa mayaa-. ta.vaaDa¸ ija.zaNao. |
| 2 | Baa[-Mdr³p.´ baakaola sT/IT yaoqaIla naraonaa kMpa}MD ka^ËITIkrNa krNao. | $.2¸18¸850 À¹ | mao.klpt$ majaUr kamagaar sahkarI saMsqaa¸ ta.ija.zaNao. |
| 3 | Baa[-Mdr³pU.´ isanaop`a[-masamaaorIla rsta du$stIsah DaMbarIkrNa krNao. | $.5¸00¸000 À¹ | rajalaxmaI majaUr kamagaar sahkarI saMsqaa mayaa-.ta.]lhasanagar |

| | | | |
|---|---|---|---|
| 4 | Baa[-Mdr³p.´ baakaola sT/IT yaoqaIla $plaxmaI [maart to rajalaxmaI [maartIcyaa maagaIla baajaU pya-Mt gaTar baaMQaUna sla^ba TakNao. | $.4¸97¸400 À¹ | EaI jayaAMbao majaUr kamagaar sahkarI saMsqaa mayaa-. ta.ija.zaNao. |
| 5 | Baa[-Mdr³pU.´ gaNaoSa¸ maMgalamautI-¸ samaaor rsta tyaar krNao. | $.5¸00¸000 À¹ | rajalaxmaI majaUr kamagaar sahkarI saMsqaa mayaa-.ta.]lhasanagar |
| 6 | Baa.p.saudamaanagar padcaarI pula to inama-laa inakotna skula pya-Mt naalyaavarIla iBaMt du$stI va baaMQakama krNao. | $.1¸95¸325 À¹ | mao.p`itxaa majaUr kamagaar sahkarI saMsqaa mayaa-. ta.AMbarnaaqa¸ ija.zaNao. |
| 7 | Baa[-Mdr³pU.´ isaQdI¸ vaËtuMD [maartI samaaor rsta tyaar krNao. | $.5¸00¸000 À¹ | yaSaaoQana majaUr kamagaar sahkarI saMsqaa mayaa-.ta.maurbaaD¸ ija.zaNao. |
| 8 | Baa[-Mdr pUva-¸ piScama yaoqaIla Aaraogya koMd`asaazI laobaa^roTrI¸ fina-car va isaivhla kamao krNao. | $.5¸00¸000 À¹ | mao.rajalaxmaI majaUr kamagaar sahkarI saMsqaa¸ ta ]lhasanagar¸ ija.zaNao. |
| 9 | imara¹Baa[-Mdr mahanagarpailaka h_It baoMca maak- pa^[MT baaMQaNao. | $.1¸63¸010 À¹ | mao.klpt$ majaUr kamagaar sahkarI saMsqaa¸ ta.ija.zaNao. |
| 10 | AarxaNa Ë.122 ³D´ cao jaagaoBaaovatI tarocao kuMpNa iBaMt baaMQaNao.<br>1´ mao.rajaoEaI [MTrp`ayajaosa<br>2´ mao.A^po@sa [MjaIinaArIMga ka^.<br>3´ mao.sTar kMnsT/@Sana<br>4´ mao.ikrNa iD.paTIla | | $.2¸43¸127À¹<br>20.00% jaast dranao<br>12.00% jaast daranao<br>5.00% jaast daranao<br>AMdajap`~kIya daranao |
| 11 | DaoMgarI va taraoDI gaavaatIla AMtga-t rsto du$stI krNao.<br>1´ mao.gaNaoSa Dovhlapsa-<br>2´ mao.parsa kMnsT/@Sana<br>3´ mao.caMd`a kMnsT/@Sana<br>4´ mao.AaSaapura kMnsT/@Sana kMpnaI | | $.8¸95¸635À¹<br>0.06% kmaI dranao<br>AMdajap`~kIya daranao<br>7.00% jaast dranao<br>5.10% jaast dranao |
| 12 | DaoMgarI va taraoDI gaavaatIla AMtga-t gaTaro du$stI krNao.<br>1´ mao.gaNaoSa Dovhlapsa-<br>2´ mao.parsa kMnsT/@Sana | | $.8¸95¸739À¹<br>0.05% kmaI dranao<br>AMdajap`~kIya daranao |

| | | |
|---|---|---|
| | 3´ mao.caMd`a kMnsT/@Sana<br>4´ mao.AaSaapura kMnsT/@Sana kMpnaI | 4.00% jaast dranao<br>5.75% jaast dranao |
| 13 | DaoMgarI palaKaDI saMrxak iBaMtIjavaLIla rsta banaivaNao.<br>1´ mao.gaNaoSa Dovhlapsa-<br>2´ mao.parsa kMnsT/@Sana<br>3´ mao.caMd`a kMnsT/@Sana<br>4´ mao.AaSaapura kMnsT/@Sana kMpnaI | $.8¸00¸760À¹<br>AMdajap`~kIya daranao<br>3.00% jaast dranao<br>5.00% jaast dranao<br>6.20% jaast dranao |
| 14 | Baa[-Mdr ³p.´ baalaajaInagar vasaaht raoDvartI Ëa^sa Do/na baaMQaNao.<br>1´ mao.yaSa [MTrp`ayajaosa<br>2´ mao.maaoyaa- kMnsT/@Sana<br>3´ mao.saalaaSana kMnsT/@Sana<br>4´ mao.gau$d%t kMnsT/@Sana kMpnaI | $.50¸000À¹<br>1.20% jaast dranao<br>AMdajap`~kIya daranao<br>2.00% jaast dranao<br>1.50% jaast dranao |
| 15 | imara¹Baa[-Mdr mahanagarpailaka h_It sT/IT laa[-T pahNaI kma-caa¹yaaMnaa ronakaoT va saayakla doNao baabat. | $.26¸250À¹ |

**1´ mao.yauiTlaITI [MTrp`ayajaosa**

| A.Ë. | tpiSala | naga | dr | r@kma |
|---|---|---|---|---|
| 1 | saayakla | 7 | 3200.00 | 22¸400À¹ |
| 2 | ronakaoT | 7 | 550.00 | 3¸850À¹ |
| | | | ekuNa | **26¸250À¹** |

**2´ mao.naoTvak- kMnsT/@Sana**

| A.Ë. | tpiSala | naga | dr | r@kma |
|---|---|---|---|---|
| 1 | saayakla | 7 | 3550.00 | 24850À¹ |
| 2 | ronakaoT | 7 | 675.00 | 4725À¹ |
| | | | ekuNa | **29¸575À¹** |

**3´ mao.emap`ayar kMnsT/@Sana**

| A.Ë. | tpiSala | naga | dr | r@kma |
|---|---|---|---|---|
| 1 | saayakla | 7 | 3300.00 | 23170À¹ |
| 2 | ronakaoT | 7 | 650.00 | 4550À¹ |
| | | | ekuNa | **27¸650À¹** |

varIla pOkI A.Ë.1 to 9 hI kamao AMdajap~k dranao ijalha majaUr saaosaayaTI maaf-t k$na GaoNyaasa va A.Ë.10 to 15 yaa kamaakrIta zokodaraMnaI saadr kolaolyaa inaivada maQaIla savaa-t kmaI inaivada QaarkakDUna kama k$na GaoNyaasa va inaivadasa maa.Aayau@t yaaMnaI maMjaUrI idlaolaI Aaho. sadr A.Ë.1 to 15 ih kamao Avalaaoknaaqa- saadr krNyaat Aalao.

सही/-
मा. सभापती
स्थायी समिती सभा

## मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे आभार मानून आजची सभा संपल्याचे जाहिर करत आहे.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी १२.४५ वा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**